# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com




# योगाभ्यासातून शिक्षित, सुसंस्कृत व स्वस्थ नागरिक घडविणे आजची गरज - जिल्हाधिकारी

## *बुलढाण्यात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा * २५०० योगप्रेमींचा सहभाग





**बुलडाणा (जिमाका)**– ''योगाभ्यासाच्या माध्यमातून शिक्षित, सुसंस्कृत व स्वस्थ नागरिक, युवक घडविणे ही आजची गरज आहे,'' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात केले. जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलढाणा येथे शनिवारी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या विशेष योग कार्यक्रमात शहरातील सुमारे २५०० योगप्रेमींनी सहभाग नोंदवून निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी राजेंद्र पौळ, अनिल गोडगे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम.मोहन, जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, मुख्याधिकारी गणेश पांडे, पत्रकार राजेंद्र काळे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.किरण पाटील म्हणाले की, योगाभ्यास आजची गरज आहे. देशभरात प्रत्येक ठिकाणी हजारो नागरिक योग दिनाच्या आयोजनात सक्रीय सहभाग घेत आहेत व निरामय आयुष्य जगण्याची जीवनशैली अंगीकारत आहेत. बुलढाणा जिल्हावासियांनीही आपल्या निरोगी आरोग्यासाठी योग जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन आयुष मंत्रालय, क्रीडा व युवक सेवा संचालनालय य, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, जिल्हा योग संघटना, आरोग्य भारती, क्रीडा भारती, आर्ट ऑफ लिव्हींग, योग विद्याधाम, आरोग्य विभाग, योगांजली योग वर्ग, पतंजली योग समिती, ए.एस.पी.एम.आयुर्वेद महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा जिल्हा एकविध खेळ संघटना, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना, अखिल भारतीय योग शिक्षक महासंघ, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, आरोग्य भारती, क्रीडा भारती, ब्रम्हकुमारीज, योग प्रशिक्षार्थी, जिल्ह्यातील योग संस्था, शाळा-महाविद्यालये व विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमात अंजली परांजपे, प्रशांत लहासे, भुषण मोरे, उर्मिला दीदी, अच्युतराव उबरहंडे, बालयोगी क्षितीज निकम आदींनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. प्राणायाम, कपालभाती, अनुलोम-विलोम व ध्यानसाधना यासारखे योगप्रकार शिस्तबद्धरीत्या घेण्यात आले.

सहकार विद्यामंदिर, शारदा ज्ञानपीठ, पोदार इंटरनॅशनल स्कूल, सेंट जोसेफ इंग्लिश स्कूल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नर्सिंग कॉलेज, समाजकार्य महाविद्यालय, आयुर्वेद महाविद्यालय आदी संस्थांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आणि शासकीय कार्यालयांचे अधिकारी, शिक्षक, क्रीडाप्रेमी नागरिक, योगप्रेमी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी आयुष मंत्रालय अंतर्गत उपस्थितांना योगा मॅट्स तसेच योगप्रेमींकरिता टि-शर्टचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे शेवटी जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रभाकर वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता जिल्हा प्रशासन, नगर परिषद प्रशासन, शिक्षण विभाग, क्रीडा विभाग, इत्यादींनी परिश्रम घेतले. अंतिम टप्प्यात सचिन खाकरे व उर्मिला दीदी यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने योग दिन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# योग साधनेमुळे निरोगी जीवन जगण्यास मदत होते- मुख्याधिकारी अमोल लांडे








**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**– आपले शरीर सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान एक तास तरी योग साधना करावी. आणि आपल्या शरीर संपत्तीचे रक्षण करावे. योग साधने मुळे निरोगी जीवन जगण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन संग्रामपूर नगरपंचायतचे मुख्याधिकारी अमोल लांडे यांनी योग सत्राचे उद्घाटन प्रसंगी केले. स्थानिक नगरपंचायत यांचे विद्यमाने व शहरातील संत गुलाबबाबा विद्यालय , जि.प. हायस्कूल तसेच स्वामी विवेकानंद सार्व. वाचनालय यांचे सहकार्याने ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन आज २१/ जून रोजी जिल्हा परिषद हायस्कूल संग्रामपूरचे प्रांगणात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जि.प. हायस्कूलचे प्र. मुख्याध्यापक योगेश कुकडे होते. तर प्राचार्य अशोक थोटांगे,क्रिडा शिक्षक सुधीर मानकर,प्रल्हाद सावतकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रथमतः भारत मातेच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलन करण्यात येवून हारार्पण करण्यात आले. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग प्रशिक्षक प्राचार्य अशोक थोटांगे यांनी प्राणायाम,ध्यान साधना, सूर्यनमस्कार, या सह विविध प्रकारची आरोग्य वर्धक शारीरिक आसने घेतली. ह्यावेळी शालेय विद्यार्थी आणि गावातील नागरिकांसह महिलांची जवळपास २०० लोकांची उपस्थिती होती. ह्यावेळी तंबाखू, खर्रा आदी तंबाखू जन्य पदार्थ सेवन न करण्याची सार्वजनिक शपथ घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न.पं.चे अधिक्षक विशाल येऊले,लेखाधिकारी राहुल दाभाडे, पियुष वानरे,संजय तांदूळकर, विठ्ठल वानखडे, पवन सातव,सुभाष चवरे, सागर करांगळे, पवन मुकणे, नाना मानकर, दिपक शेगोकरसह नगर पंचायत कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा कारागृहात योगदिन



**बुलढाणा (जिमाका)** : जिल्हा कारागृह व जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने कारागृहात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यात्रसंगी कारागृह अधीक्षक संदीप भुतेकर, जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव नितीन पाटील, ॲड. मारोडकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, तसेच कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. योग शिक्षक डॉ. वैशाली नाईक यांनी नियमित योग अभ्यास करण्याच्या लाभाबाबत मार्गदर्शन केले. तसेच कारागृहात राहून यशवतंराव चव्हाण मुक्त विद्यापिठामार्फत योग शिक्षकाचे शिक्षण पूर्ण करणारे चार बंदी यांनी यावेळी कारागृहातील इतर बंद्यांकडून योगाभ्यास करुन घेतला. योग अभ्यासानंतर ॲड.विक्रांत मारोडकर यांनी बंद्यांना कायदेविषयक मालसा व नालसाच्या सर्व योजनांची माहिती देवून मार्गदर्शन केले.

# महात्मा फुले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी केली योग साधना



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महात्मा फुले हायस्कूल निमगाव येथे २१ जूनच्या सकाळी सात वाजता शाळेतील विद्यार्थ्यांनी योगक्रियांचे प्रात्यक्षिक सादर करून योग साधना केली. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व व योग साधना अंगीकारावी याकरिता योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष के.आर.इंगळे होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक एस. डी. राठोड यांनी विद्यार्थ्यांना जीवनात योगाचे महत्व व आधुनिक काळात शारीरिक व्याधी पासून दूर राहण्याकरता दररोज योग साधना करण्याचे मौल्यवान मार्गदर्शन केले. त्यानंतर क्रीडा शिक्षक जी.एस. गायकी यांच्या मार्गदर्शनात निकुंज पंकज भोपळे, संतोष गजानन ढेंगे, ऋषिकेश अनंता भोपळे, आदित्य निशांत बोंबटकार आदी विद्यार्थ्यांनी प्रथम व्यासपीठावरून विविध योग प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकरता सादर केली. त्यानंतर सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योग साधना केली. प्रत्येक योग सादर करताना करावयाची कृती व त्याचा शरीराला होणारा फायदा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

नियमित वाचा – महासागर
बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क 9561361404

# ११ व्या जागतिक योग दिनानिमित्त सामुहिक योग साधना कार्यक्रम



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)**– आज २१ जून रोजी, तालुका क्रीडा संकुल व गोविंद विष्णू महाजन विद्यालय, मलकापूर येथे ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भव्य सामूहिक योग साधना कार्यक्रमात सहभागी होऊन उपस्थितांना मार्गदर्शन करण्याचा योग लाभला. योग प्रशिक्षक भरत शहा, प्रदीप जंगले, योगेश पाटील तसेच राष्ट्रीय क्रिकेटपटू कु. मानसी पांडे यांनी उपस्थित नागरिकांना योगाभ्यासाचे प्रभावी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष यश भैय्या संचेती, तहसीलदार तथा कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष राहुल तायडे, गटशिक्षणाधिकारी फाळके, नारखेडे साहेब, ॲड. गणेश पाटील (अध्यक्ष, योगा ग्रुप) यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

तसेच या योग उपक्रमाला चंद्रकांत साळुंके, शैलेंद्रसिंग राजपूत, स्वप्नील साळुंके, समीर शेख, जय गाढे, दिनकर गायकवाड, संतोषजी बोंबटकर, संजयजी गावंडे, सुरेशभाऊ संचेती, कुणालसिंह राजपूत, कान्हासिंह राजपूत, गुड्डुभाऊ कपुर, गोपालसिंह राजपूत, जयविजय राठी, दीपक कपले, विनोद अकोटकर, संजयजी काजळे, मिलिंद डवले, शंकर वाघ, मोहन शर्मा, योगेश पटणी, दुर्गेशजी राजापुरे, गोपालभाऊ पाटील, श्री.हजारे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. महिलांनी व तरुणींनीही मोठ्या संख्येने सहभाग घेऊन योगसाधनेत उत्साहाने भाग घेतला. हा उपक्रम आरोग्यप्रेमी नागरिकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरला.

# योगाने शरीर सुदृढ व निरोगी राहते-डॉ.अपर्णा कुटे

## जळगाव नगर परिषदेच्यावतीने जागतिक योग दिन साजरा



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय योग दिन नगरपरिषद जळगाव जामोद यांच्यामार्फत मोठ्या उत्साहात साजरा केला योगा फोर वन अर्थ वन हेल्थ एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग स्थानिक नगर परिषद जळगाव जामोद कार्यालयामार्फत सांस्कृतिक भवन येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. अपर्णाताई कुटे, तहसीलदार पवन पाटील,नगरपरिषद जळगाव जामोद मुख्याधिकारी डॉ.सुरज जाधव ,भाजपा जिल्हाध्यक्ष सचिनबापू देशमुख, माजी नगराध्यक्षा अनिता जैस्वाल, माजी नगरसेवक निलेश शर्मा ,भाजपा शहराध्यक्ष कैलास पाटील, बाळूचव्हाण, छाजेड साहेब, हिस्सल,परम राजपूत यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक योग गुरु पुष्पा कसूरकार मॅडम व प्रजापती ब्रह्मकुमारी शशी दीदी ह्या होत्या. त्यानंतर सर्वांनी व्यसनमुक्ती व स्वच्छतेची शपथ घेण्यात आली त्यानंतर योग गुरु पुष्पा कसूरकार व अनुराधा बारहाते यांनी आसने व प्राणायाम घेतले व त्याचे महत्त्व समजून सांगितले त्यानंतर प्रजापिता ब्रह्मकुमारी शशी दीदी यांनी ध्यान व साधनेचे बाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाला शहरातील विविध संघटनांनी सहभाग नोंदवला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रकल्प अधिकारी अनिल इंगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी डॉ.सुरज जाधव यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषद सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले व मोठ्या उत्साहात कार्यक्रम यशस्वी पार पडला..

# वरोडी येथील जिल्हा परिषद शाळेत योग दिन साजरा



**सिंदखेडराजा (महासागर प्रतिनिधी)**– तालुक्यातील वरोडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये २१ जून जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला .

यावेळी शिक्षक खांडेभराड यांनी योग दिनाबद्दल महत्व पटवून देत उपस्थित विद्यार्थी तसेच गावातील नागरिकांकडून योगासने करून घेतली '

तसेच नवीन योगासने करायला शिकवले,योगामुळे आरोग्य सुदृढ राहते मनशांती लाभते ,काम करण्यामध्ये उत्साह वाढतो असे सुद्धा योग गुरु यांनी सांगितले 'सदर योग दिनाला सरपंच सुधाकरराव गारोळे ' उपसरपंच गोपाल गारोळे' ग्रामपंचायत सदस्य प्रदीप खरात . सर्व ग्रामपंचायतचे सदस्य तसेच मुख्याध्यापक रंगदळ सर ,सहाय्यक शिक्षक खांडेभराड , वैद्य सर ' किशोर गारोळे सर ' तसेच सर्व ग्रामपंचायतचे कर्मचारी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले



## तहसीलदार प्रशांत पाटील व पथकाची कारवाई

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**– रात्रीच्या सुमारास पाळत ठेवून व वेषांतर करून अवैध वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडून तामगाव पो.स्टे.ला जमा केले आहे.

याबाबत प्राप्त माहिती अशी की जिल्ह्यासह आपल्याही तालुक्यात अवैध वाळू (रेती) वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने तहसीलदार प्रशांत पाटील यांनी वेशांतर करून दि.२१ /जून चे रात्री साडेतीन वा.च्या सुमारास तालुक्यातील काही नद्या नाल्यावरुन वरून अवैध वाळू तस्करी होत असल्याचे समजल्यावरून

तहसिलदार प्रशांत पाटील व त्यांचे पथक घेवून मोमीनोबाद शिवारात ट्रॅक्टर साठी थांबेल असता त्यामध्ये बिनापरवाना एक ब्रास अवैध वाळू (रेती) आढळून आली. यावरून त्यामध्ये तेल्हारा जि. अकोला येथील माळेगाव (बाजार) येथील ट्रॅक्टर चालक शुभम ज्ञानदेव भगत त्यांचे ताब्यात घेवून सदर वाळू वाहतुकीचे ट्रॅक्टर दिसून आले आहे.त्यानुसार सदर कारवाई युवा तहसिलदार प्रशांत पाटील यांच्यासह ना. तह. राहुल वसावे ,मंडळ अधिकारी रवींद्र म. बोराखडे , ग्राम महसूल अधिकारी सुनिल कुसळकार,व भगवान रावणकार यांनी व सहकार्याने केली आहे.

# यंदा पंढरपूरसाठी २ जुलैपासून स्पेशल रेल्वे



**खामगाव (का.प्र.)** - आषाढी एकादशीला पंढरपूर जाण्यासाठी भाविकांकरीता स्पेशल रेल्वे गाड्यांची सुविधा रेल्वे प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहे. खामगाव विठ्ठल दर्शन एक्सप्रेस व्यतिरीक्त नागपूर - मिरज, न्यू अमरावती - पंढरपूर, भुसावळ - पंढरपूर अशा स्पेशल गाड्यांची सुविधा उपलब्ध आहे. या गाड्या २ जूलै पासूनच राहणार आहे. त्यामुळे भाविकांना पंढरपूर जाण्यासाठी यंदा २ ते ५ जूलै दरम्यान स्पेशल रेल्वेचा उपयोग घेता येणार आहे. न्यू अमरावती - पंढरपूर ही ०१११९ क्रमाकांची स्पेशल रेल्वे २ व ५ जूलै रोजी अमरावती येथून संध्याकाळी ५ वाजता सुटणार आहे. या गाडीला शेगाव,जलंब, नांदूरा, मलकापूर थांबा आहे. त्याचप्रमाणे ४ व ५ जूलै रोजी गाडी क्र. १२०५ नागपूर - मिरज स्पेशल रेल्वे नागपूर येथून दुपारी १.५८ ला सुटणार असून या गाडीला शेगाव- मलकापूर थांबा आहे.

ही गाडी पंढरपूर व्हाया मिरजला जाणार आहे. ३ व ६ जूलै रोजी खामगाव - पंढरपूर ही विठ्ठल दर्शन एक्सप्रेस सकाळी ११.३० वाजता खामगाव येथून निघणार आहे. तर ५ जूलै रोजी भुसावळ - पंढरपूर स्पेशल गाडी दुपारी १.३० वाजता भुसावळ येथून पंढरपूरसाठी रवाना होणार आहे. तर पंढरपूर येथून परतीच्या प्रवासाकरीता ४ व ७ जूलै रोजी पंढरपूर - न्यू अमरावती सकाळी ९.२७ वाजता यानंतर ६ व ७ जूलै रोजी मिरज -नागपूर ही स्पेशल रेल्वे मिरज येथून संध्याकाळी ६.१३ वाजता सुटणार आहे.

तसेच ४ व ७ जूलै रोजी पंढरपूर -खामगाव ही विठ्ठल दर्शन एक्सप्रेस पंढरपूर येथून खामगावसाठी पहाटे ५ वाजता निघणार आहे. या स्पेशल रेल्वेगाड्यांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### वीजपुरवठा खंडित प्रकरणी महिलांचा अधिकाऱ्यांना घेराव

**मलकापूर** - गेल्या काही महिन्यापासून मलकापूर परिसरात वीज पुरवठा खंडीत होण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. वीज पुरवठा खंडीतचा प्रकार थांबविण्यात यावा या मागणीसाठी आज २० जून रोजी वंचितच्या वतीने महावितरण कंपनीच्या कार्यालयावर जावून महिलांसह पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी आंबेडकर नगरातील महिला सौ.रक्षाताई सावळे, मोनिका सावळे, वर्षा अवसरमोल, प्रिया इंगळे, उषा लोखंडे, माया अवसरमोल, आशाबाई इंगळे, उषा गवई, विद्या वाकोडे, उमाताई भगत, पायल वाकोडे, प्रतीक्षा सावळे, सुनंदा सावळे, अनिता सावळे, इंदुबाई ससाने, सीताबाई इंगळे, माया इंगळे, आचल इंगळे, सुरेखा वानखडे, रजिया चव्हाण यांच्यासह तालुकाध्यक्ष अजय सावळे, तालुका महासचिव भीमराव नितोने, कोषाध्यक्ष ख्वाजा इलियाज, अरविंद सोनवणे, अजबराव वाघ, बाळू गवई उपस्थित होते.

### दुचाकी लंपास ; गुन्हा दाखल

**शेगाव** - येथील गजानन महाराज पार्किंग मधून दुचाकी लंपास झाल्याची घटना १९ जून रोजी उघडकीस आली. याबाबत ज्ञानेश्वर बासुदेव बडे वय ४२ वर्ष रा. अलंमपूर ता. नांदुरा यांनी शहर पोलिसात तक्रार दिली की, मित्रासोबत शेगाव येथे संत गजानन महाराज यांचे दर्शनाकरीता मोटरसायकलने आलो व मोटरसायकल संत गजानन महाराज पार्कींग मध्ये उभी करून मदिरात गेलो. सकाळी ११ वा. आम्ही मोटर सायकल उभी केलेल्या ठिकाणी आलो असता, संत गजानन महाराज पार्किंग मध्ये मोटर सायकल मिळून आली नाही. माझी मोटरसायकल हिरो होंडा स्प्लेंडर कंपनीची काळया रंगाची व एम एच २८ बीपी ६४९६ क्रमांकाची किंमत ४५०००/-ची दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोऊश्न नेली आहे. तिच्या तिचा शोध व्हावा. अशा फिचे रिपोर्टवऊश्न कलम ३०३(२)बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वादळी वाऱ्यामुळे शेतातील सौर पॅनल कोसळले

**शेगाव** - येथून जवळच असलेल्या कळंबा बुद्रुक येथील शेतकरी आशाताई रामभाऊ ढगे यांच्या शेतातील सौर पॅनल बुधवारी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे कोसळल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सौरऊर्जेच्या पॅनलवर शेतातील सिंचन अवलंबून होते. पण वादळामुळे हे पॅनल कोसळून गेले आहे. त्यामुळे शेतातील पाणीपुरवठा बंद झाला असून पिकांचे नुकसान होत आहे. आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत असताना पुन्हा निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्याला बसला आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

# लोणारमध्ये मेडिकल व किराणा दुकान फोडणाऱ्या चोरट्यांना ७ लाखांच्या मुद्देमालासह अटक

**खामगाव (का.प्र.)** - लोणार शहरातील कुशल मेडिकल व किराणा दुकान फोडून रोख रक्कम व साहित्य चोरल्याप्रकरणी लोणार पोलिसांनी तिघा चोरट्यांना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीने मारुती इर्टिगा गाडी, कटर, कटावण्या, तलवार, चाकू, हातोडा अशा साहित्याच्या मदतीने चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस गस्तीदरम्यान संशयित गाडी आढळून आल्यानंतर पाठलाग करताना वाहनाचा टायर फुटल्याने गाडी रस्त्याच्या कडेला आदळली व आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी शिताफीने एकाला पकडले व पुढील तपासातून उर्वरित दोन आरोपींनाही अटक केली. अटक केलेल्यांत कृष्णा सुदाम छेडीदार (रा. जळगाव), साहेबराव ऊर्फ बप्पा पाराजी चाळक (रा. बिड) व परमेश्वर अशोक गायकवाड (रा. छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या सहकार्याने पार पडली. इतर आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# जागतिक योग दिनानिमित्त देविदास शर्मा यांचा सत्कार

**खामगाव (का.प्र.)** - आज २१ जून या दिवशी जागतिक योगदिन म्हणून साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने खामगाव येथील गुड मॉर्निंग गृप व पतंजली योग समिती खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भैयुजी महाराज आश्रम येथे योग शिक्षक राजेंद्र सिंग राजपूत पतंजली योग पिठ हरिद्वार आश्रम प्रशिक्षित यांच्या प्रमुख उपस्थितीत योग महोत्सव आयोजित करण्यात आला.

यावेळी श्री सद्गुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे सामाजिक क्षेत्रात सदा अग्रेसर असणारे सेवा भावी निस्वार्थी श्री सद्गुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा यांना पहेलवान सुभाष दादा पाटील युथ फाऊंडेशन कोल्हापूर व्दारे राष्ट्रीय महाराष्ट्र राज्य भुषण पुरस्कार व हिंदी मराठी राष्ट्रीय पत्रकार संघ दैनिक अहिल्या राज वृत्तपत्रा व्दारे इंडियन एक्सलन्स अवार्ड २०२५ पुरस्कार मिळाल्याबद्दल देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी योग




शिक्षक राजेंद्र सिंह राजपूत.विश्वहिंन्दु परीषद जिल्हा अध्यक्ष राजेश झापर्डे.बापू करंदीकर सर रमाकांत गलांडे .पतंजली तालुका अध्यक्ष भिकाजी रेठेकर.अखिल भारतीय मराठा महासंघ क्रिडा विभाग जिल्हा अध्यक्ष विकास चव्हाण. गोलु ठाकूर .राम बुंदेले. महादेव सुकाळे .अमित जोशी. मंगेश भोपळे. सुनील सातव. दिलीप डंबेलकर.बबन पोकळे , कैलास कदम. रमेश लोढे. देवगिरी कर. श्याम तोडेकर. अनिल भदाळे .संजय केळकर पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई द्या

## भोनगाव येथील शेतकऱ्यांची तहसीलदार यांना निवेदन



**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - सन २०२४ - २५ वर्षातील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई करण्यात यावी अशी मागणी भोनगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तहसीलदार मार्फत निवेदनाद्वारे १९ जून रोजी केली आहे. शेगाव तालुक्यातील भोनगाव येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. आधीच सततची नापीकी व दुष्काळजन्य परिस्थिती असताना यंदा चांगल्या प्रमाणात पीके असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या परंतु ऐन वेळेवर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या तोंड कशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेने हिरावून घेतला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सरपंच सौ राजश्री लक्ष्मण गवई, अनंता शेळके लक्ष्मण गवई, वैभव पातोंडे, रवी शेळके, संतोष शेळके, संदीप शेळके, विठ्ठल शेळके, संतोष तराळे, गणेश शेळके, रमेश पिंपळकर, गजानन तराळे, वैभव तराळे, गणेश भिसे, शिवाजी शेळके यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी केली आहे.

# वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ

**खामगाव (का.प्र.)** - २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा पाटी बसवण्यासाठी राज्य सरकारने ३० मार्च पर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर ही मुदत ३० एप्रिलपर्यंत देण्यात आली. यासाठी राज्य सरकारकडून तीन कंपन्यांना हे टेंडर दिले. त्यानंतर मोठ्या प्रमाणात प्रादेशिक परिवहन विभागात उच्च सुरक्षा पाटी बसवण्यासाठी कार आणि बाईक चालकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. दरम्यान, वाहनांची संख्या आणि वाहनधारकांचा अल्प प्रतिसाद मिळत असल्यामुळे राज्य सरकारने या पाट्या




बसविण्यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. ही मुदतवाढ आता १५ ऑगस्टपर्यंत असणार आहे. जर आपण नवीन दिलेल्या मुदतवाढीचा विचार केला तर दररोज ३ लाख ९६ हजार ७१ वाहनांना पाटी बसवावी लागणार आहे. काही ठिकाणी तर दीड ते दोन महिन्यांची प्रतीक्षा वाहनचालकांना करावी लागत आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलेल्या मुदतीमध्ये या पाट्या लावता येणार नाहीत. हे लक्षात घेऊन सरकारने मुदतवाढ दिली आहे. मात्र, मुंबईसह इतर शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये वाहनधारकांनी अजूनही पाट्या लावल्याचं दिसून येत नाही. शासनाने या आधी देखिल दोन वेळा मुदतवाढ दिली होती. परंतु अजूनही काही वाहनधारक नंबर प्लेट बसवत नसल्याचं दिसून येत आहे.

# मलकापूर न.प.च्या नगरसेवकांची सदस्य संख्या ३० होणार

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकापुर्वीचे कार्यक्रम राबविण्यास सुरूवात झाली असून महायुती शासन व निवडणूक आयोगानेही निवडणूक प्रक्रियेला सुरूवात केली आहे. मलकापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नगर परिषदेची नगरसेवकांची सदस्य संख्या ३० होणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था ज्यामध्ये महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, नगर पंचायतच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर चार महिन्याच्या आत घेण्याच्या निर्देशानंतर महायुती शासन व निवडणूक आयोग जोमाने कामाला लागले असून निवडणुकी पुर्वीच्या प्रक्रियेकरीता अध्यादेश, आदेश, परिपत्रकनुसार कार्यक्रम लावण्याचा सपाटा लावला आहे. नगर परिषदेची सदस्य संख्या निश्चित करण्यात आल्याची विश्वसनीय वृत्त असून याबाबतचा अहवाल नुकताच शासनाकडे दाखल करण्यात आल्याचे समजते. सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार सदस्य संख्या निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे.

# पालकांनी पाल्याचा शैक्षणिक कल ओळखून सुप्त कलागुणांना वाव द्यावा- शिक्षणाधिकारी अनिल अकाळ

# मराठा सेवा संघाच्यावतीने सर्वधर्मिय गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** : एक विद्यार्थी घडला व तो जर नोकरीवर किंवा अधिकारी पदावर विराजमान झाला तर तो त्याच्या तिन पिढ्यातील विद्यार्थी घडवू शकतो. यामुळे पालकांनो विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रात आवड आहे ते क्षेत्र निवडण्याची त्यांना मोकळीक द्या. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडून यश संपादन करत आई-वडिलांचे नाव उंचवावे, असे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.बुलढाणा अनिल अकाळ यांनी केले.

आज २१ जून रोजी मराठा सेवा संघाच्या वतीने जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वधर्मिय गुणवंतांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन छत्रपती शिवराय मराठा मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते. यावेळी विशेष उपस्थिती म्हणून अनिल आकाळ तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रामीण पो.स्टे.चे ठाणेदार संदीप काळे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि.विजयकुमार ठुबे हे होते. तर प्रमुख उपस्थितीत कृउबासचे सभापती संजय काजळे, भाराकाँ नेते अॅड.साहेबराव मोरे, राकाँ नेते संतोषराव रायपुरे, कृउबास संचालक साहेबराव पाटील, सुभाष पाटील, प्रविण क्षिरसागर, विजय साठे, केदार एकडे, ज्ञा ना हिवाळे सर,बी.सी.महाजन, संजय पाटील मुक्ताईनगर प्रसादराव जाधव, बाळूभाऊ पाटील, राजू साठे, राजू पाटील, राजेंद्र वाडेकर, शंकरराव पाटील, संजय गावंडे सर, दिपक चांभारे, जयदीप पाटील, साहेबराव जगताप, हरीभाऊ पाटील सर, राजूभाऊ गावंडे, मोहनराव पाटील, सोनोने साहेब, गटशिक्षणाधिकारी एन.जे. फाळके,एन. बी. शिंदे शिक्षण विस्तार अधिकारी, पत्रकार हनुमान जगताप, अमर पाटील, सुधाकर भाऊ, लक्ष्मणराव घनोकार, प्रा. अमोल पाटील, प्रा.किशोर मोरे, दिलीप अढाव सर, धनंजय संबारे (ऑस्ट्रेलीया), भगवान सोईस्कर,अजाबराव धोरण, प्रमोद सोनोने, सोपान भाऊ शेलकर, ज्ञानदेव ढगे, संभाजी शिर्के, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक



मनिष मानकर, अमर पाटील, इंजि.सौ. कोमलताई सचिन तायडे, ह भ प महादेव महाराज खोडके, ह.भ.प. नितीन महाराज, वनितताई गायकवाड, शिलाताई संबारे, आश्विनीताई देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी मराठा सेवा संघाच्या वतीने जिल्हा सचिव इंजि. सचिन तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली १० वी ८५ टक्केचे वर व १२ वी मध्ये ८० टक्केच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या, स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वधर्मिय विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. एनएमएमएसच्या विद्यार्थ्यांचा, नीट परीक्षतील गुणवंतांचा, क्रीडा क्षेत्रातील प्राविण्यप्राप्त, अधिकारी नियुक्त, पीएचडी पदवीप्राप्त, वैद्यकीय पदवी प्राप्तांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला मलकापूर शहर व ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थ्यांनी, पालकांनी अभूतपुर्व अशी हजेरी लागल्याने छत्रपती शिवराय मंगल कार्यालयाचा सभागृहही कमी पडला होता.

तर अॅड.साहेबराव मोरे यांनी आयोजकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्वधर्म समभावाची शिकवण घेत या सोहळ्याला सर्वधर्माचे स्वरूप दिल्याने त्यांचे आभार व्यक्त केले.

तर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक मनिष मानकर यांनी विद्यार्थ्यांनी केवळ इंजिनिअर व वैद्यकीय शिक्षण याकडेच न वळता अनेक नोकरीच्या संधी असणाऱ्या शिक्षणाकडे वळावे, याबाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देत मार्गदर्शनासाठी आपण सदैव तत्पर असल्याची ग्वाही दिली. तर विजयकुमार ठुबे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आपल्या परिवाराला संपुर्णत: यशस्वी करण्यासाठी कसोसिने प्रयत्न करत उच्च शिक्षण घेवून अधिकारी पदापर्यंत मजल मारावी असे आवाहन करीत अशा प्रकारचे सोहळे आयोजित करून आयोजकांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे मनोबल वाढविल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

तर प्रास्ताविकात मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी आयोजनाबद्दल माहिती देत विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी दिवस-रात्र एक करून मेहनत घ्यावी लागते. अशा मेहनती विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पाठीशी सदैव उभे राहणाऱ्या पालकांचे कोठेतरी कौतुक होणे गरजेचे असते. यामुळेच आपण या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करीत असल्याचे सांगत या यशस्वी विद्यार्थ्यांच्या गुणगौरवा पासून प्रेरणा घेत भविष्यात विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्यास तेच आमच्या कार्यक्रमाची खरी पावती ठरेल, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन मराठा सेवा संघाचे मलकापूर तालुकाध्यक्ष रविभाऊ खराटे सर, संजय रहाटे यांनी तर आभार प्रदर्शन विष्णू म्हैसागर यांनी केले. यावेळी जिजाऊ वंदना वेदांगी पाटील, जिजाऊ ढगे यांनी म्हटली. तर मंचकावर स्वयंसेवक म्हणून यांचेसह योगेश येरळीकर, शिवराज वनारे, अथर्व संबारे, अद्विका रहाटे, समीक्षा रहाटे, हर्षदा म्हैसागर आदींनी योगदान दिले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कैलासराव तायडे, , संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष योगेश पाटील, एस.पी.संबारे सर,दिलीप अढाव सर, विष्णू म्हैसागर, उल्हासराव संबारे, पुरूषोत्तम वनारे, नवल तायडे, संभाजीराव गायकवाड, मंगेश धोरण, शिवाजी देशमुख, विजय गायकवाड, निलेश आसटकर, अमोल देशमुख सर, अॅड.निलेश तायडे, शिवाजी देशमुख, किरण अहिरे साहेब, चंद्रशेखर तायडे, विवेक तायडे, जुनारे सर, गोपाळ रायपुरे, अजय तायडे, रविंद्र भोलणकर, रोशन पाटील, अण्णा गायकवाड, प्रमोद क्षिरसागर, राहुल संबारे, सुनिल संबारे, दिलीप कोल्हे, संजय खोडके, सुयोग गावंडे, चेतन खोडके, डॉ.चेतन जाधव, अॅड.जी.डी.पाटील, मनोज घोंगटे,अशोक मराठे, संजय सावळे सर, सी आर पाटील सर, प्रकाश खराटे सर,योगेश येरळीकर, संदीप बोंडे, सुरळकर सर, प्रशांत अढाव, दिलीप देशमुख, विशाल पाटील, मुकेश जगताप, संभाजी गायकवाड, उल्हास धोरण, पंकज जंगले, गजानन तायडे,विष्णू भाऊ पाटील, नारायण बाठे ,पिंटू पारस्कर, गजानन काकर, पत्रकार नितीन पवार, सिध्देश देशमुख, विजय अढाव, अक्षय जुनारे, निखिल कोकाटे, गणेश शिंदे, गजानन अढाव, श्रीकृष्ण अढाव, रवि लांडे, विवेक तायडे, गजानन काकर, गजानन संबारे, संदीप सारोकार, राहुल वनारे, शुभम काजळे, शुभम लाहुडकर, श्रीकृष्ण क्षिरसागर, इच्छाराम संबारे, विष्णू संबारे यांचेसह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व आयोजन समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी विद्यार्थी १० वी व १२ वी मध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण होतात. त्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा कोठेतरी सन्मान व्हावा व या होत असलेल्या सन्मानामुळे व याठिकाणी मिळत असलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी प्रेरीत होत जिद्दीने उच्च शिक्षणात यश संपादन करावे या हेतूने आम्ही सदर कार्यक्रम आयोजित करीत असल्याचे त्यांनी सांगून कुठल्याही विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी अडीअडचण आल्यास मराठा सेवा संघ सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहील अशी ग्वाही दिली.

RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव[बुलढाणा]
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

